अण्णाभाऊ साठे व शंकरराव खरात यांच्या कथेतील गावगाड्याचे चित्रण

प्रा. विलास गोवर्धन पेटकर
मराठी विभागप्रमुख
नीळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय,
भद्रावती, जि. चंद्रपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार, कार्य आणि प्रेरणेने निर्माण झालेल्या आंबेडकरवादी साहित्य प्रवाहाने कविता, कथा, कादंबरी, नाटक, स्वकथन या वाङ्मय प्रकाराच्या माध्यमातून एकूणच मराठी साहित्यविश्वाला एक नवे भान दिले. आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत मराठी साहित्यविश्वाच्या कक्षा रूंदावल्या. विशेषत: कथात्म साहित्यामुळे आंबेडकरवादी साहित्याने मराठी कथाविश्वाला वेगवेगळ्या अनुभवविश्वातून प्रचंड हादरे दिले. नवे भान दिले. आंबेडकरवादी कथा साहित्याने मराठी कथा साहित्य प्रवाहासमोर नवे विश्व, नवे जगणे आणि माणूस केंद्रबिंदू असणारे अनुभवविश्व ठेवले. मराठीत अभावाने आढळणारे प्रखर वास्तव आंबेडकरवादी कथा साहित्याने प्रथमच लोकांसमोर मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारकार्याची प्रेरणा घेऊन लिहीणाऱ्या आंबेडकरवादी साहित्यिकांच्या पहिल्या पिढीतील कथाकारांनी दलित आणि बारा बलुतेदारांच्या समग्र जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण केले. यामध्ये गावगाडा आणि गावगाड्याला वेढून राहिलेल्या बारा बलुतेदारांच्या दु:ख, दैन्य, दारिद्र्य, जातीयता, संघर्ष, श्रद्धा, अंधश्रद्धा, बलुतेदारी यातून उद्‌भवणारी दरी याही गोष्टीचे चित्रण केले. वास्तविक पाहता 'गावगाडा' हे खेडे आणि ग्राम्य वास्तवाचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्राण आहे.

भारत हा खेड्यांचा देश आहे. कृषीप्रधानता हा खेड्यांचा विशेष आहे. बारा बलुतेदारांशिवाय कोणतेही खेडे स्वातंत्र्यपूर्व काळात आणि आजपर्यंत जीवंत नव्हते. आज जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण या गोष्टी आल्या असल्यातरी गावगाडा हा महत्वाचा होता. आज गावगाडा ही संकल्पना नव्या जागतिकीकरणाच्या फसव्या धोरणाखाली मोडीत निघाली असली तरी हा गावगाडा पूर्वी कसा होता. त्याचे स्वरूप कसे होते. याचे प्रखर वास्तववादी चित्रण आंबेडकरवादी कथाकारांनी आपल्या कथांमधून घडविले आहे. गावगाड्याचे वास्तववादी चित्रण घडवताना आंबेडकरवादी कथाकारांनी स्वानुभवातून घडविले आहे. आंबेडकरवादी कथाकारांचे अनुभवविश्व किती विशाल आणि जगावेगळे आहे याचा अनुभव त्यांच्या कथा वाचताना प्रत्ययास येते.

'गावगाडा' म्हटले की, कुलकर्णी, पाटील यांच्यापासून ते महार, मांग, ढोर, चांभार, सोनार, लोहार, कुंभार यांच्यापर्यंत ते सबंध गावगाड्यातील लोकांचा निर्देश होतो. या बारा बलुतेदारांच्यामुळेच गावपांढरी आणि गावगाडा यांच्यातील समग्र व्यवहाराला पूर्णत्व येते. गावगाड्यात कुलकर्णी, पाटील आणि बारा बलुतेदार यांच्या नित्याचे व्यवहार असतात. नित्याचे संबंध असतात. गावगाड्याशिवाय गावाला गावपण येत नाही. अशा गावगाड्याचे समग्र चित्रण आंबेडकरवादी साहित्य प्रवाहातील पहिल्या आणि दुसऱ्या, तिसऱ्या पिढीतील कथाकारांनी समर्थपणे केले आहे.

अणाभाऊ साठे, बंधुमाधव, बाबुराव बागूल, शंकरराव खरात, केशव मेश्राम, वामन होवाळ, योगिराज वाघमारे, अमिताभ, योगेंद्र मेश्राम यांच्यापासून ते शरणकुमार लिंबाळे पर्यंतच्या पहिल्या आणि दुसऱ्या पिढीतील कथाकरांचा अंतर्भाव होतो. या सर्व कथाकारांनी अतिशय समर्थपणे स्वानुभवातून 'गावगाडा' आणि गावगाड्याला वेढून राहिलेल्या समग्र समाज जीवनाचे प्रखर वास्तववादी चित्रण आपल्या कथेतून केल्याचे स्पष्टपणे दिसते. असे चित्रण करीत असताना या कथाकारांनी कोणताही अभिनिवेश बाळगल्याचे आपल्या निदर्शनास येत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारकार्याची प्रेरणा घेऊन लिहिणाऱ्या कथाकारांनी एक सजग भान ठेवून सातत्याने लेखन केल्याचे स्पष्टपणे जाणवते. बाबासाहेबांच्या शिका! संघटीत व्हा! आणि संघर्ष करा! या मूलमंत्राने अनेकांनी ज्ञानासाठी, जागृतीसाठी शिक्षणाचा मार्ग अवलंबला. शिकून शहाणे झालेल्या पिढीने बाबासाहेबांचा 'शहरांकडे चला' हा संदेश शिरोधार्य मानून नोकरी, व्यवसाय, चळवळ या माध्यमातून शहर गाठले, असे असले तरी त्यांनी पूर्वायुष्यात जगलेले, भोगलेले अनुभवविश्व विसरले नाहीत. उलट त्यांना शहरातील व्यवस्था आणि गावगाड्यातील व्यवस्था यातील फरक स्पष्टपणे जाणवू लागला. शहरात आल्यानंतर गावगाड्यातील व्यवस्थेची दाहकता किती तीव्र होती याचे त्यांना भान आले. वाचनाने आलेल्या सजग दृष्टीमुळे प्रचलित साहित्यातील ढोबळपणा, खोटेपणा त्यांच्या लक्षात आला आणि म्हणून बाबासाहेबांच्या प्रेरणेने नवी दृष्टी लाभलेल्या आंबेडकरवादी कथाकारांनी आपण ज्या गावातून, ज्या प्रदेशातून, ज्या जातीतून आलो. लहानाचे मोठे झालो, त्या ग्राम्य व्यवस्थेतील पर्यायाने गावगाड्यातील समग्र जीवनाच्या चित्रणाला सुरूवात केली. हे जीवन कवितेपेक्षा कथा वाङ्मयातून अधिक सक्षमपणे होऊ लागले.

अण्णाभाऊ साठे हे आंबेडकरवादी कथाकारांच्या पहिल्या पिढीतील एक महत्त्वाचे आणि सम्यक दृष्टी असलेले कथाकार आहेत. 'बरबाद्या कंजारी', 'भानामती', 'नवती', 'गजाआड', 'ठासलेल्या बंदुका,' 'लाडी,' 'जिवंत काडतूस,' 'फरारी', 'रानवेली', 'गुन्हाळ', 'चिरानगरातील भूतं', 'कृष्णाकाठच्या कथा' हे अण्णाभाऊ साठे यांचे प्रसिद्ध कथासंग्रह आहेत.

अण्णाभाऊ साठे यांची स्वत:ची अशी एक जगणं आणि लिहिणं या बद्दलची स्वतंत्र भूमिका होती. म्हणून तर त्यांनी गावगाडा आणि गावगाड्याला वेढून राहिलेल्या उपेक्षित, वंचित, शोषित आणि तरीही आत्मविश्वासाने जगणाऱ्या माणसाचे प्रभावी चित्रण केले आहे.

गावगाड्यात दलित आणि सवर्ण म्हणजे बलुतेदार आणि अलुतेदार यांचे जीवन व्यवहार एकमेकांवर अवलंबून असतात. नित्याच्या जीवन व्यवहारापासून कोणीही फारकत घेत नाही. व्यवहारावरून संघर्ष झाला, शिवीगाळ झाली, ताणतणाव निर्माण झाला तरीही हे संबंध संपत नाहीत. दोन जातीतील हे ताणतणाव आणि संघर्ष तत्कालीन असतात. उलट एरव्ही समूह भावनेत हे लोक एकमेकांना साथ देतात. असा गावगाडा अण्णाभाऊ साठे यांच्या कथेत चित्रित होतो. हजारो वर्षापासून पाण्यापासून ते शिक्षणापर्यंत वंचित राहिलेल्या गावगाड्यातील उपेक्षित समाजाचे, दु:खदायी, वेदनादायी चित्रण अण्णाभाऊ साठे यांची कथा करते.

स्वानुभवातून कथालेखन करणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांना आपल्या उपेक्षित समाजातील कोणताही माणूस विद्रुप होऊ नये. तो गावगाड्यातील जातीयतेमुळे उध्वस्त होऊ नये असे वाटते. म्हणून तर ते आपल्या कथालेखनाविषयी आणि भूमिकेविषयी लिहीतात,'' मी जे जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो, तेच लिहीतो. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही.''[१]

अण्णाभाऊ साठे यांची स्वत:च्या लेखनाविषयी अशी एक प्रांजळ भूमिका होती. माणूस केंद्रबिंदू ठेवून लिहिणाऱ्या आणि जगणाऱ्या प्रत्येक माणसाकडे पर्यायाने लेखकाकडे अशी एक ठाम भूमिका असावी लागते. अण्णाभाऊ साठे यांच्याकडे अशी भूमिका होती. म्हणूनच तर उपेक्षित लोकांच्या जगण्याचा परीघ ओलांडून अण्णाभाऊ साठे यांची कथा अन्य गोष्टीचा विचार करीत नाही. गावगाड्याशी प्रत्यक्ष संबंध आल्यामुळे अण्णाभाऊ साठे यांची कथा गावगाड्यातील नानाविध गोष्टींना कवेत घेते. आणि गावगाड्यावर भाष्य करते.

अण्णाभाऊ साठे यांची 'थडग्यातील हाडं' ही कथा सबंध गावगाड्याचे आणि त्यातील अंतर्गत सामाजिक जीवनाचे चित्रण करते. या कथेतील बारा बलुतेदार हे भूक आणि दारिद्र्याने पिचलेले आहेत. पण असे असले तरी त्यांनी स्वाभिमान आणि जगण्याचे धैर्य सोडलेले नाही. तारणगावावर धनगर दरोडा घालणार असल्याची चिट्ठी बजाजी पाटलाला देतो. जर गावावर दरोडा नको असेल तर सात हजाराची खंडणी द्यावी लागेल असे सांगतो. तारणगाव मधील सावकार, जमीनदार, आपली जमीन, संपत्ती घरदार, दागदागिने आणि त्याहीपेक्षा आपला जीव वाचवण्यासाठी खंडणी देण्यासाठी तयार होतात, आणि अशी ही

खंडणी सर्व गावाने वर्गणी काढून द्यावी असेही गावातील सर्व सवर्ण लोक सांगतात. पण अशा गोष्टीला महार, मांग, रामोशी आणि सर्व बलुतेदार विरोध करतात. आमच्याकडे पैसे नाहीत पण कर्तृत्व आहे, धाडस आहे असे गावाला सांगतात. एवढेच नव्हे तर आपण खंडणी देण्याऐवजी जीव देऊ असे म्हणतात. गावगाड्यातील बारा बलुतेदारांचे धैर्य आणि विश्वास पाहून बजाजी पाटील त्यांच्या बाजूने उभा राहतात आणि गावगाड्यातील बारा बलुतेदारासोबत लढण्यासाठी तयार होतात. बजाजी पाटील सवर्ण असूनही दलितांच्या बरोबरीने मल्ल्या धनगर आणि त्यांच्या टोळीबरोबर लढतात. अशा लढाईत रायनाक महार मारला जातो. तेव्हा तारणगांव पाटलांसह सबंध गावाला प्रचंड दु:ख होते अण्णाभाऊ साठे या दु:खद घटनेचे वर्णन करताना आपल्या कथेत लिहतात.''पाटलानं हंबरडा फोडला सर्व लोक चौकात जमले. म्हातारी—कोतारी माणसं आली आणि सर्वांनी त्याला पाणी पाजलें. बायका—पोरांनी आक्रोश आरंभला.''[२] गावासाठी एक अस्पृश्य माणूस स्वत:चे बलिदान देतो आणि त्याच्या बलिदानाने संपूर्ण गावाला आपल्या कुटूंबातीलच एक माणूस गेल्याचे दु:ख होते. गावच्या पाटलांच्या हंबरड्याने आणि गावातील लोकांच्या आक्रोशाने गावगाड्यातील सामाजिक जाणिवेचे, आपुलकीचे आणि जातपात विसरून निदर्शनास येणाऱ्या गावगाड्याचे चित्रण अशा प्रकारे अण्णाभाऊ साठे यांनी समर्थपणे केले आहे. महार, मांग, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, परीट, गुरव, कोळी, चौगुला व अठरा नारू म्हणजे अलुतेदार तेली, तांबोळी, साळी, शिंपी, माळी आणि वतनदारामध्ये सरकार उपयोगी वतनदार व रयत उपयोगी वतनदार या सर्वांचे म्हणजे बलुतेदार, अलुतेदार, वतनदार यांच्या जीवनाचे चित्रण अण्णाभाऊ साठे यांच्या कथांतून येते. म्हणजे अप्रत्यक्षपणे गावगाडा त्यांच्या कथांतून चित्रित झालेला दिसतो. अण्णाभाऊ साठे यांच्या कथातून जो गावगाडा अभिव्यक्त होतो त्यामध्ये गावगाड्यातील समग्र वास्तवाचे चित्रण येते.

गावगाड्याच्या चित्रणाच्या बाबतीत 'निळू मांग' ही अण्णाभाऊ साठे यांची एक महत्त्वाची कथा आहे. निळू मांग हा साजूर गावातील एक सज्जन माणूस त्याच्यावर गावाचे सरंजामदार पाटील गुन्हेगारी लादतात, आणि त्याचं जीवन उध्वस्त होतं. 'आपण गुन्हेगार नाही. आपण इमानदार आहोत. राम्या सुतार नि चिम्या पाटील यांनीच आपल्याला डिवचून या भयंकर मार्गाला लावलं. तेच खरे गुन्हेगार आहेत.' असे तो सांगतो. पण त्याचे हे मत कोणीही लक्षात घेत नाही. या कथेतील निळू मांग या उपेक्षित माणसाच्या चित्रणाबाबत अण्णाभाऊ साठे यांनी दाखविलेल्या सहानुभूतीविषयी डॉ. प्रकाश कुंभार म्हणतात, ''अण्णाभाऊंनी या कथेत एक माणूस म्हणून जगू पाहणाऱ्या माणसाची गावगाड्यात कशी चोहोबाजूंनी नाकेबंदी केली जाते याचं उघडंवाघडं चित्रण केलं आहे.''[३]

गावगाड्यातील अशा एकेक बलूतेदार माणसाच्या रूपाने अण्णाभाऊ साठे यांनी गावगाड्याचे सबंध स्वरूप आपल्या कथेच्या रूपाने आपल्या समोर ठेवलेले आहे. 'शिकार' या कथेतील गंगाराम माहुताला पोटाचीच चिंता आहे. टरफलातून पावटा निघावा तशी सरकारी नोकरी जाईल म्हणून अन्याय, अपमान, दु:ख, छळ सहन करण्याचे गंगाराम व्रत घेतो. तो आपल्या लहरी हत्तीला म्हणतो, 'तू बी राजावणी केलंस. आज माझ्या पोटावर पाय दिलास?' 'निखारा' या कथासंग्रहातील 'सूड' नावाची कथा ही महत्वाची आहे. गावगाड्यातील महार समाजातील मारूती पोतराज हा आपल्या बायकोचे आणि मुलांचे पोट भरण्यासाठी लक्ष्मीच्या नावाने भिक्षा मागतो. याचा फायदा घेऊन पोटाचं साधन असलेली पाच एकर जमीन नानाचंद्र मारवाडी बळकावतो. 'कोंबडी चोर' ही अण्णाभाऊ साठे यांची गावगाड्यातील भूक दारिद्र्यात, जगणाऱ्या माणसांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी महत्त्वाची कथा आहे. या कथेतील रामू कोंबडया चोरून विकत असतो. एकदा तर तो एका म्हातारीची कोंबडी पकडतो आणि कोंबडीची पांढरी पिसे उपटून तिलाच विकतो. चोरीच्या धंद्यावरून त्याला कोंबडी चोर असे नांव पडते. अण्णाभाऊ साठे यांनी या कथेद्वारे फक्त समूहाचेच दु:ख सांगितले नाही तर, स्वातंत्र्यात सुध्दा पोटाची भूक भागवता न आल्याने उपाशीपोटी दिवस काढणाऱ्या सामान्य जनतेच्या दु:खाचेही विराट दर्शन ते घडवितात. ''गावगाड्यातील विशेषत: दलितांच्या जीवनामध्ये नैतिक मूल्याची जाणीव कशी जागते आणि जागविली जाते याचे चित्रण अण्णाभाऊ आपल्या कथांतून करतात''[४] अण्णाभाऊ साठे यांनी गावगाड्याचे आणि

गावगाड्याला वेढून राहिलेल्या समग्र जीवनाचे मत तंतोतंत खरे वाटते. कारण अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या कथांतून केलेले गावगाड्याचे चित्रण हे जीवंत आणि पारदर्शी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रत्यक्ष सहभाग लाभलेले आणि त्यांच्या विचारकार्याची प्रेरणा घेऊन लिहिणारे शंकरराव खरात हे आंबेडकरवादी साहित्यिकांच्या पहिल्या पिढितील महत्त्वाचे लेखक आहेत. खरात यांनी कथा, कादंबऱ्या, स्वकथन, प्रवासवर्णन, समीक्षालेखन या वाङ्मय प्रकारातून विपूल लेखन केले आहे. खरातांचे वैचारिक लेखनही तितकेच महत्त्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारमुल्याचे दर्शन घडविणारे खरातांचे लेखन आजही तितकेच महत्त्वाचे मानले जाते. विशेषत: शंकरराव खरात यांनी आशय—अभिव्यक्तीच्या बाबतीत विपूल कथालेखन करून आंबेडकरवादी मराठी कथेत मौलिक भर घातल्याचे स्पष्टपणे जाणवते.

'बारा बलूतेदार','सांगावा,' 'तडीपार', 'टिटवीचा फेरा','सुटका', 'दौडी', 'गावशिव', 'आडगावचे पाणी', 'माझा काय दोष?','मुलाखत', 'वारस', 'जागल्या' इत्यादी खरातांच्या नावावर कथासंग्रह आहेत. शंकरराव खरात यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ प्रत्यक्ष पाहिली होती. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर खेडे आणि गावगाडा प्रत्यक्ष अनुभवला होता. गावगाड्यातील नानाविध गोष्टींचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. किबंहुना बलूतेदारी आणि गावकीसारखी हीन दर्जाची कामे त्यांनीही केली होती. स्वभाविकच स्वानुभवातुन शंकरराव खरात यांनी आपल्या कथांमधून तत्कालीन गावगाड्याचे जिवंत चित्रण केले आहे.

बाबासाहेबांच्या चळवळीचा प्रत्यक्ष सहवास लाभल्यामुळे खरात यांच्याकडे वास्तव चित्रणाच्या बाबतीत एक प्रकाराचा वैचारिक संयम जाणतो. त्यांचा 'सांगावा' हा एक प्रसिद्ध कथासंग्रह आहे. संग्रहाच्या शिर्षकात आणि 'सांगावा' कथासंग्रहातील कथांमधून खरातांनी गावगाड्यांचे जीवंत चित्रण केले आहे. 'सांगावा' संग्रहातील 'भानगड' ही महत्त्वाची कथा आहे. या कथेतील गुणाबाई ही विधवा आहे. गुणाबाई आपल्या कलावती मुलीसाठी आपले वैधव्य विसरून जीवन जगत असते. कलावती मोठी होते आणि गावातील शाळा मास्तरसोबत तिचे प्रेमसंबंध जुळतात. पुढे एके दिवशी आईला न सांगताच ती मास्तरबरोबर पळून जाते, ह्या प्रकाराने गावगाड्यातील वातावरण गढूळ होते. कलावतीला अशा प्रकाराने सगळा गांव छी थू करू लागतो. कलावतीच्या अशा कृत्यामुळे गुणाबाईला प्रचंड मानसिक धक्का बसतो. मुलीसाठी जगणारी गुणाबाई मुलीच्या अशा अनैतिक कृत्याने मानसिक संतुलन बिघडवून बसते. आणि आपल्या मुलीला मास्तरने दिलेल्या साड्या पेटवते आणि त्या बरोबर स्वत:लाही पेटवून घेते. गुणाबाईची ही अवस्था पाहून गुणाबाईला दोष देणाऱ्या गावाची मानसिकता पूर्णत: बदलते. सगळा गाव यानिमित्ताने गुणाबाईच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतो. या निर्णयाचा एक भाग म्हणून मास्तरानेच गुणाबाईला मारून तिला जाळण्याचा प्रयत्न केला त्यामुळे आपल्या गावाची अब्रु गेली, तेव्हा आपण स्वस्त बसून चालणार नाही असा पवित्रा गाव घेतो. गावचा कारभारी गावकऱ्यांच्या मनाची खात्री करून घेऊन पोलिसांकडे गुन्हा नोंद करण्यासाठी पोलिस पाटलांना सूचना देतो. तर दुसरीकडे आठ—दहा तरूण हातात कुऱ्हाडी घेऊन बदली होवून गेलेल्या मास्तराला आणण्यासाठी शिवधडीला जातात. इकडे अर्धमेल्या अवस्थेत स्वत:ला पेटवून घेतलेल्या आणि रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या गुणाबाईला काही माणसं रात्रभर वारा घालत, पाणी पाजत बसलेली असतात. पहाटे पहाटे गुणाबाई शुद्धीवर येऊन हालचाल करू लागते. तेव्हा गावातील माणसं बोलू लागतात.

''गुणाई जिती होतीय वाटतं!''
''बरं झालं! रंडकंमुंडकं वाचल''
''आरं बाबा! ठीक झालं! आपल्या शिरावराचा बोजा कमी झाला! आता आपोआपच झाल्या गोष्टीचा खरेपत्ता लागील.''[५]

गावगाड्यात कितीही जात, धर्म, पंथ असले तरी, एखाद्या सामाजिक प्रश्नावर आणि गावाची इज्जत जपण्यासाठी गावातील प्रत्येक माणसाची अस्मिता जपण्यासाठी सर्व काही विसरून सगळा गांव कसा एकत्र येतो याचे भेदक चित्रण शंकरराव खरातांची कथा करते.

शंकरराव खरात यांचा 'बारा बलुतेदार' हा अत्यंत महत्त्वाचा कथासंग्रह आहे. संग्रहाच्या शीर्षकावरून या कथासंग्रहाचे आणि गावगाड्याचे काय संबंध असतील याची जाणीव आपणास होते. बारा बलुतेदाराशिवाय गावगाड्यास पूर्णत्व येत नाही. उलट गावगाडा हा कुठल्याही गावाचा प्राण असतो. थोडक्यात त्रि. ना. अत्रे म्हणतात, तसे, ''गावगाडा म्हणजे एकंदर गावचे एकत्र कुटुंब''[६] तर अशा विविध जाती, धर्म आणि पंथानी एकत्रित बांधलेल्या गावगाड्यातील बलुतेदार आणि अलुतेदार यांचे नित्याचे संबंध, व्यवहार अंतर्गत ताणतणाव, जिव्हाळा, आपुलकी संघर्ष आणि तरीही ऐक्य कसे होते याचे अत्यंत संयमपूर्ण चित्रण 'बारा बलुतेदार' या कथा संग्रहातील कथांमधून खरातांनी केले आहे.

'बारा बलुतेदार' संग्रहातील 'रामा महार' ही पहिलीच कथा या दृष्टीने महत्त्वाची आहे. या कथेतील नायक रामा महार याला गावकीची कामे करावी लागतात. गावगाड्यातील ही एक जुनी पद्धत होती. गावगाड्यातील महार समाजाकडे गावकीची सगळी कामे करण्याची परंपरा होती. या परंपरेचे चित्रण खरातांनी या कथेत केले आहे. रामा महाराचा मुलगा आजारी असताना देखील मामलेदाराचे टपाल नेण्याचे, लाकडे फोडण्याचे आणि मामलेदाराने सांगितलेल्या प्रत्येक कामाचे कर्तव्य पूर्ण करावे लागते. घरात असणाऱ्या आजारी मुलाकडे लक्ष देण्यास अथवा त्याला औषध पाणी करण्यासही पैसे नसतात. पोलिस पाटीलही अनेक कामांच्या बाबतीत त्याला छळत असतो, आजारपणातच त्याचा पोटचा मुलगा मृत्यू पावतो. रामाला आपल्या मुलाच्या मृत्यूने धक्का बसतो. रामाच्या अशा दु:खदायी अवस्थेचा विचार न करता पोलिस पाटील त्याला दवंडी देण्याविषयी सांगतो. तेव्हा रामा महाराला या गोष्टींचा संताप येतो आणि तो पोलिस पाटलांला उद्देशून म्हणतो, ''आमी काय माणूस हाय का गुरढोर हाय? कवाबी म्हाराला गावकीच्या कामाला जुपावं.''[७]

''गावगाड्यात बारा बलुतेदारांच्या वाट्याला कोणती वेदना, कोणती समस्या येते याचे वास्तवदर्शी चित्रण खरातांची कथा करते. रामा महाराच्या दैनंदिन जीवनाचे चित्रण करताना खरातांनी रामा महाराच्या प्रतिनिधिक माध्यमातून गावगाड्यात दलितांच्या वाट्याला येणाऱ्या भूक, दारिद्र्य आणि मोडक्या संसाराचेही चित्रण केले आहे. गावगाड्यात होणाऱ्या आपल्या कुतरओढीचे आणि हालाखीचे दु:ख सांगताना रामा म्हणतो, ''जलूम गेला कामानं, पन पोटभर आन मिळंना. अंगाला धडूत लागंना. अन् आज या कामापाय पोटचा गोळा मातीला घातला.''[८]

रामा महार हा एका अस्पृश्य समाजातील अपवाद सोडला तर, माळेगावचा कोळी, दादू परीट, तात्या सुतार आबा रामोशी, दामू गुरव इत्यादी अस्पृश्य नसलेल्या परंतु दारिद्र्याने गांजलेल्या गावगाड्यातील बलुतेदारांचे चित्रण करून खरातांनी प्रमाण दलित मानसिकता ओलांडून गावगाडा कथारूपी स्वरूपात लोकांसमोर आणला आहे. गावगाड्याचे चित्रण करीत असताना खरातांनी गावकीच्या, म्हारकीच्या कामात गावगाड्यात दलितांना भोगावी लागणारी दु:खे, त्यांच्या जिवनाची होणारी ससेहोलपट, 'सांगावा', 'कमाई', 'भार','दौडी', 'धुराळा', 'मी माणूस आहे' इत्यादी कथांतून चित्रित केले आहे. ही सर्व माणसं गावगाड्याच्या वतनी कामात गुरफटून गेली आहेत. गावगाड्यात गावकीच्या कामात त्यांना सोसावे लागणारे दु:ख, व्यथा, वेदना व त्यांच्या दारिद्र्याचे चित्रण खरातांनी नि:पक्षपातीपणे केले आहे.

शंकरराव खरात लेखक आणि वकिल अशा दोन्ही भूमिकेत जगत होते आणि लिहित होते. वकिली व्यवसायात पक्षकार म्हणून गावगाड्याशी संबंधित असणाऱ्या कैकाडी, रामोशी, बेरड, भामटे, उचले, फासेपारधी, मांगगारूडी, डोंबारी, कोल्हाटी, माकडवाले इत्यादी जमातींचा त्यांचा जवळचा संबंध आला होता. प्रचलित समाजाने गुन्हेगार समजून 'तडीपार' केलेल्या पण गावकूस आणि गावगाड्याशी नित्याचा संबंध असणाऱ्या उपेक्षित लोकांच्या जीवघेण्या जगण्याचे चित्रण खरातांनी विलक्षण जिव्हाळ्याचे केले आहे.

'तडीपार' कथासंग्रहातील 'माकडवाला' ही कथा त्यादृष्टीने फार महत्त्वाची आहे. बाळेवाडीच्या माळावर दरसालाप्रमाणे माकडवाले उतरतात. आपली पालं उभी करून राहतात. माकडाचा खेळ करून भीक मागून जीवन जगतात. गंगाराम म्हातारा हा माकडवाल्या पालांचा म्होरक्या असतो. गावातील मळेकऱ्यांची कणसं कुणीतरी खुडलेली असतात. त्याचा आळ गंगाराम आणि त्यांच्या माकडवाल्या लोकांवर येतो. पोलिस आणि पाटिलही गंगारामला दोष देतात. परंतू गावगाड्याशी संबंधित असणारा गंगाराम माकडवाला पोलिसांना ठामपणे सांगतो,''भामट्याचा गुन्हा पचायचा अन् माकडवालं दानाला दियाचं. माकडासारख्या मुक्या प्राण्याला आमी शिकवतो ! आम्हाला का कळत न्हाय पोलिसांचं!'' [९] आणि शेवटी मळेकऱ्यांच्या कणसांचे नुकसान माकडवाल्यांनी केले नाही हे पोलिस आणि पाटील यांनाही समजतं शेवटी गंगाराम आपल्या जीवनाला वैतागून म्हणतो, ''शेजारगुणं म्हणून आपल्यावरही पाळत असेल ! म्हणूनशान म्हणतो, आता कायमची वस्ती बगा! ''[१०]

गावगाड्याशी संबधित असणाऱ्या अशा फिरस्त्या लोकांना आपली एक स्वत:ची हक्काची, सुरक्षित वस्ती असावी असे वाटते. त्यामुळे आपल्याला अन्न नसेना का पण सुखाचे जीवन तरी जगता यावे असेही वाटते. उपेक्षित, वंचितांच्या प्रश्नाकडे शंकरराव खरात आपले लक्ष असे वेधून घेतात.

संदर्भ सूची :

१. साठे अण्णाभाऊ, 'बरबाद्या कंजारी', विद्यार्थी प्रकाशन, १७८,'ब' पार्वती, पुणे—९ नवीन आवृत्ती, डिसेंबर २००४, प्रस्तावना, पृ. ७
२. पानतावणे गंगाधर/चंद्रकुमार नलगे (संपा),'दलित कथा', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, पहिली आवृत्ती, जानेवारी १९८१, पृ. ६
३. कुंभार प्रकाश, 'दलित साहित्य : काही विचार काही दिशा', कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २००२, पृ. ८७
४. तत्रैव, पृ. ९३
५. खरात शंकरराव, 'सांगावा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर पुणे, ३०, चौथी आवृत्ती, १९८२, पृ. ७०
६. अत्रे त्रिं. ना., 'गावगाडा', वरधा बुक्स प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, १९८९ पुनर्मुद्रण, १ जानेवारी १९९५, पृ. २१२
७. खरात शंकरराव, 'बारा बलुतेदार', इनामदार प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९५९, पृ. १३
८. तत्रैव, पृ. १३
९. खरात शंकरराव,'तडीपार' इंद्रायणी साहित्य, २७३, शनिवार पेठ, पुणे—३०, प्रकाशन दिनांक—१७ सप्टेबर २०००,पृ. ३६
१०. तत्रैव, पृ. ३६